# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - ०८/०२/२०१८

## वानवडी पोलीसांकडुन घरफोडी व वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन ९.३९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व ०५ मोटार सायकली जप्त करण्यात आलेल्या आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.ना.निसार खान व पो.शि.नासीर देशमुख यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, दोन विधी संघर्षग्रस्त बालक हे कृष्णानगर कडुन तरवडे वस्तीकडे जाणार असुन त्यांचेकडे एक चोरीची मोटार सायकल असल्याचा संशय आहे. त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन विधी संघर्षग्रस्त बालकांना हिरो होंडा स्प्लेंडर एन.एक्स.जी. मोटार सायकल क्रमांक एम.एच.१९/बी.एच/९२६५ सह ताब्यात घेवुन, त्यांना वानवडी पोलीस ठाणे येथे आणुन, विश्वासात घेवुन अधिक विचारणा केली असता त्यांनी वानवडी पोलीस ठाणेकडील ०१ घरफोडी, व ०३ वाहन चोरी तसेच कोंढवा पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी, भारती विद्यापीठ पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी असे एकुण ०१ घरफोडी व ०५ वाहन चोरी मिळुन एकुण १,३५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आायुक्त श्री मिलिंद पाटील सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री ऊमेश तावसकर सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.रमेश भोसले, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.अनुप सांगळे, पो.शि.कानीफनाथ कारखेले, पो.शि.प्रतिक लाहीगुडे यांच्या पथकाने केली.